# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मोखाडा (जि.पालघर) येथील तहसिलदार कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१) ४०६१८ (०१-०४-२०२२). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) येथील तहसीलदार कार्यालयात महसूल व संजय गांधी निराधार योजना या विभागातील नायब तहसिलदार, महसूल सहाय्यक लिपिक तसेच ५ पदे शिपाई अशा एकूण १३ कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदांपैकी ५ पदे रिक्त असल्याने सदरची रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याची मागणी तालुक्यातील नागरिकांनी तसेच आदिवासी संघटनांनी दिनांक ०६ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तहसिलदार कार्यालयातील रिक्त पदे भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२३) :** (१) मोखाडा तहसिल कार्यालयात एकूण मंजूर पदे ६० आहेत व त्यापैकी ४० पदे भरलेली असून २० पदे रिक्त आहेत. ज्यामध्ये महसूल व संजय गांधी योजना शाखेमधील ३ ही नायब तहसिलदार संवर्गाची पदे भरलेली आहेत. याशिवाय महसूल सहायक/लिपिक संवर्गाच्या १० पैकी ०७ पदे व शिपाई संवर्गाची ५ पैकी २ पदे भरलेली आहेत.

(२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक ०२.११.२०२१ नुसार राज्य शासकीय कार्यालयातील गट-क संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोटयातील लिपिकवर्गीय पदे यापुढे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला असल्याने आयोगाकडे पाठवावयाचे मागणीपत्र सादर करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार पालघर जिल्यातील गट-क संवर्गातील नामनिर्देशनाच्या कोटयातील लिपिकवर्गीय पदे आयोगामार्फत भरण्याचे प्रस्तावित आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाचा आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत वित्त विभागाच्या दिनांक ३१.१०.२०२२ च्या शासन निर्णयानुसार वाहनचालक व गट-ड ची पदे भरता येणार नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दातिवरे (ता.जि.पालघर) खाडीवर तरंगती जेटी तयार करण्याबाबत**

**(२) ४७७१० (२८-१०-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दातिवरे (ता.जि.पालघर) खाडीवर तरंगती जेट्टी बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांच्याकडे दिनांक १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी तरंगती जेट्टी बांधण्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणते नियोजन केले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०२३) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

दातिवरे (जि.ता.पालघर) खाडीवर तरंगती जेट्टी बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून निवेदन प्राप्त झाले असून त्यास अनुसरून संबंधित जिल्हा कार्यालयाकडून सदर काम जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रस्तावित असून सहाय्यक आयुक्त, ठाणे-पालघर कार्यालयाकडून दातिवरे येथे मच्छिमारांसाठी खाडीलगत तरंगती जेट्टी उभारण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक व आराखडा तयार करण्यासाठी पतन अभियांत्रिकी विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना कळविण्यात आले असून सदर अंदाजपत्रके प्राप्त होताच जिल्हा वार्षिक योजनेत सदर काम करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दानापूर (जि.अकोला) परिसरातील वाढत्या तापमानामुळे केळी बागायतदाराचे नुकसान झाल्याबाबत

**(३) ४८९८८ (२१-०९-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील दानापूर परिसरातील वाढत्या तापमानामुळे केळी खराब झाल्याने बागायतदारांचे नुकसान झाले असल्याचे माहे मे २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळी बागायतदार नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास दानापूर परिसरातील केळी बागांना शासनाने तात्काळ मदत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-१०-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेतंर्गत आंबिया बहार सन २०२१-२२ मध्ये माळेगाव बाजार (दानापूर परिसरासह) या महसूल मंडळातील सहभागी सर्व ४९ शेतकऱ्यांना रक्कम रु.२९.०६ लाख इतकी विमा नुकसान भरपाई विमा कंपनीमार्फत अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात रोजगार हमी योजनेची कोणतीही कामे सुरु नसल्याबाबत

**(४) ५१४५३ (१९-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात ८४१ पैकी २३९ गावांत रोजगार हमी योजनेची कोणतीही कामे सुरु नसल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या गावातील मजूर रोजगाराअभावी शहराकडे स्थलांतरीत होत असून त्यांची व त्यांच्या कुंटूंबियांची हेळसांड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन सदरील गावांतील मजूरांना गावातच रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१०-१०-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात दिनांक ६ सप्टेंबर, २०२२ रोजी एकूण ८४१ ग्रामपंचायतीपैकी कामे सुरु नसलेल्या १६०

ग्रामपंचायतींमध्ये एकूण ७३६ शेल्फवर कामे उपलब्ध होती. तथापि, खरीपाचा हंगाम सुरु असणे, अतिवृष्टीमुळे मजुरांकडून कामाची मागणी नसणे व नमुना ४ प्राप्त नसणे या कारणामुळे कामे सुरु नव्हती.
(२) हे खरे नाही.

माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये अमरावती जिल्ह्यात ३,७१,२९० एवढी मनुष्यदिन निर्मिती झालेली असून मनरेगा योजनेंतर्गत मोठया प्रमाणात मजूरांना मागणीप्रमाणे रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(३) मनरेगा ही योजना मागणी प्रवण योजना आहे. ग्रामीण भागातील अकुशल मजुरांनी नमुना-४ मध्ये कामाची मागणी केल्यानंतर त्यांना गावातच १५ दिवसांत रोजगार उपलब्ध करुन दिला जातो.
(४) विलंब झालेला नाही.

---

## ढाकणी शहरातून (जि.यवतमाळ) औरंगाबाद-माहूर या महामार्गाकरिता हजारो वृक्षांची कत्तल करण्यात येत असल्याबाबत

**(५) ५१५५८ (२३-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ढाकणी शहरातून (जि.यवतमाळ) औरंगाबाद-माहूर हा मार्ग जात असून या महामार्गाकरिता हजारो वृक्षांची कत्तल करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू महामार्ग बनविण्याचे कंत्राट ज्या कंपनीने घेतले त्या कंपनीमार्फतच वृक्ष लावणे व त्याचे संगोपन करणे गरजेचे असताना संबंधित कंपनीने दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-१०-२०२३) :** (१) व (२) ढाकणी शहरातून (जि.यवतमाळ) औरंगाबाद-माहुर हा मार्ग जात असुन या महामार्गाकरीता हजारो वृक्षांची कत्तल करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर-२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.

तथापि, सदर मार्ग हा पुसद वनविभागातील उमरखेड व महागांव वनक्षेत्राचे वनत्तेर हद्दीतुन जात आहे. सन २०१८ मध्ये कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग नांदेड येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२१ (बोरी ते मेट) रुंदीकरणाचे प्रकरणात रस्त्यांचे हद्दीतील एकूण ८०६ झाडे तसेच सन २०१९ मध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२१ (हिमायतनगर ते फुलसावंगी) या राष्ट्रीय महामार्गातील एकूण २५४ झाडांना महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ मधील तरतुदीनुसार वृक्षतोडीस रितसर परवानगी दिलेली आहे.

तोड करावयाच्या झाडांच्या बदल्यात दुप्पट झाडे लावण्याबाबतची हमी दिली असल्याचे सदर परवानगी आदेशात नमूद आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तळा (जि.रायगड) तालुक्याची निमित्त होवून कृषी विभाग व पोलीस ठाणे अद्यापही भाड्याच्या जागेत सुरु असल्याबाबत

**(६) ५३४२७ (२९-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळा (जि.रायगड) तालुक्याच्या निर्मितीला २२ वर्षे होवून कृषी विभाग व पोलीस ठाणे अद्यापही भाड्याच्या जागेत सुरू असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सदर विभागाच्या कार्यालयाच्या जागेच्या भाडयाचे शासनाचे लाखो रूपये खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाचे भाडेपोटी खर्च होणारे लाखो रूपये वाचविण्यासाठी सदर विभागाची शासनाच्या मालकीची इमारत उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२३-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्ह्यात तळा तालुक्याची स्थापना सन २००९ साली झालेली असून या तालुक्याच्या निर्मितीपासून तालुका कृषि अधिकारी, तळा हे कार्यालय सुरु झालेले आहे. सदर कार्यालयासाठी एकूण ११९९ चौ.फूट व अधिनस्त मंडळ कृषि अधिकारी कार्यालयाकरीता ४९९ चौ.फूट अशी एकूण १६९८ चौ.फूट चटई क्षेत्राची आवश्यकता आहे. या चटई क्षेत्रानुसार सदर कार्यालयाकरीता कोणत्याही शासकीय इमारतीमध्ये जागा उपलब्ध नसल्याने सन २००९ पासून शेतकरी सेवार्थ तालुका कृषि अधिकारी तळा कार्यालय खाजगी इमारतीमध्ये भाडे तत्वावर सुरु आहे.

तसेच तळा हे पोलिस ठाणे सुरुवातीला तहसीलदार तळा येथील कोषागार खोलीमध्ये कार्यरत होते. तद् नंतर तहसीलदार तळा यांनी जागा रिक्त करण्याबाबत कळविल्यानंतर दिनांक ०१.०३.२०१७ पासून तळा पोलिस ठाणे हे श्रीमती खटावकर यांचे मालकीचे खाजगी इमारत क्र.१८४४ क्षेत्र ८९.६० चौ.मी या जागेमध्ये कार्यरत आहे.
(२) तालुका कृषि अधिकारी, तळा कार्यालयाकरीता दरमहा रु.९२४५/- व मंडळ कृषि अधिकारी, तळा कार्यालयासाठी दरमहा रु.८६७०/- इतके दरमहा भाडे आकारण्यात येत आहे. सदर भाडे आकारणी शासनाच्या विहीत नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केल्यानुसार केली जात असून त्यानुसार भाडे अदा करण्यात येत आहे.

तळा येथील पोलिस ठाणे दिनांक ०१.०३.२०१७ पासून भाडयाच्या इमारतीमध्ये कार्यरत असून सदर इमारतीचे भाडे रु.१८०६३/- आकारण्यात येत आहे. सदर भाडे संबंधित घरमालक यांना भाडे पट्टी व कर या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून पोलिस अधिक्षक रायगड यांच्या कार्यालयाकडून अदा करण्यात येत आहे.
(३) तालुका कृषि अधिकारी, तळा या कार्यालयासाठी शासकीय जागा मिळवण्यासाठी तहसिलदार तळा यांचे सहकार्याने नजिकच्या शासकीय जागांची पडताळणी करुन कृषि विभागासाठी जागा आरक्षित करण्याची प्रक्रीया सुरु आहे. तथापि, अद्याप शासकीय जमीन आरक्षणासाठी निश्चित करण्यात आलेली नाही. तालुका कृषि अधिकारी तळा या कार्यालयाने दिनांक ०७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयास जागा मिळणेबाबत उपविभागीय कृषि अधिकारी माणगाव जि.रायगड यांना लेखी विनंती केली असून प्राथमिक आरोग्य केंद्राची जूनी इमारत कार्यालयीन वापरासाठी उपलब्ध करुन देणेबाबत मागणी करण्यात आली आहे. तथापि, सदर इमारत आरोग्य विभागाच्या दुसऱ्या प्रकल्पासाठी वापरात येणार असल्याने सदर कार्यालयास जागा उपलब्ध होऊ शकलेली नाही.

तळा तालुक्यातील सिटी सर्व्हे क्र.१२९९ क्षेत्र ७११.५० चौ.मी. ही जागा पोलिस अधिक्षक रायगड यांचे नावावर असल्याने सदर जागेवर तळा पोलीस ठाणे प्रशासकीय इमारत, तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी शासकीय निवासस्थाने बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक रायगड यांच्या दिनांक १५.०४.२०१७ च्या पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. वरळी मुंबई यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. वरळी मुंबई यांचेकडे सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि. ठाणे) तालुक्यात कुटूंबप्रमुखाने इतर भाऊ बंधकीचे मुळ वारस व खातेदारांची नावे न लावल्याबाबत**

**(७) ५५९३१ (२९-०१-२०२३). श्री.कैलास गोरंट्याल (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि. ठाणे) तालुक्यात वारस लावताना पूर्वीच्या कुंटूंबप्रमुखाने इतर भाऊ बंधकीचे मुळ वारस व खातेदारांची नावे न लावल्याबाबत मौजे लाखिवली व इतर गावातील जमिन मिळकतीसाठी रोहिदास तरे यांनी प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्याकडे दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील वारसांचा बनावट सही करुन बनावट जबाब नोंदवून फेरफार क्र.१३५६ चे एकाच दिवशी अगुणवत्तेच्या व अनियमिततेच्या पंधरा दिवसाची नोटीस अवधी न ठेवता फेरफार मंजुर झाल्याने तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांचा पदाचा गैरवापर करुन गैरव्यवहारातुन १३५६ या फेरफाराची नोंदणी घेतल्याने उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी सदर फेरफार रद्द करणेकामी पुनर्विलोकनाखाली घेण्यासाठी तक्रार दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारस फेरफरांच्या नोंदी घेतेवेळेस कुटूंबप्रमुख यांनी भा.द.वि. संहिता कलम १९८, १९९, २०० व १९३/२ मधील तरतूदीनुसार दंडास शिक्षेस पात्र राहतील असे प्रतिज्ञापत्र देऊन व इतर वारस डावलून फेरफार नोंदी घेतल्या जातात अश्या प्रतिज्ञापत्रावरुन वारसांची खोटी माहिती लिखित स्वरुपात देणाऱ्या प्रतिज्ञापत्र रद्द करुन त्यावरुन झालेले फेरफारांचे पुनर्विलोकनासाठी व योग्य खरे वारसांची फेरफार होण्यासाठी व वारसांमध्ये वाद निर्माण होऊन न्यायालयीन गुंतागुंती व प्रक्रिया न वाढवण्यासाठी शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन अध्यादेश काढणार काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-१०-२०२३) :** (१) दिनांक १३.१२.२०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार प्राप्त झाली नाही.

(२), (३), (४) व (५) मौजे कामतघर, ता.भिवंडी येथील फेरफार क्र.१३५६ हा स.नं.५३/२ व इतर जमिनीच्या अनुषंगाने नोंदविलेला आहे. विषयांकित फेरफार खातेदार लक्ष्मण राघो तरे हे मयत झाले असल्याने त्यांचे वारसांची नोंद करणेबाबत दिनांक २५.१०.१९६९ रोजी नोंदविलेला असून दिनांक ११.११.१९७१ रोजी सदरहू जमिनीचे सर्व्हे नंबर जुळत नाही, असा शेरा नमुद करून नोंद रद्द करणेत आली आहे. तदनंतर लक्ष्मण राघो तरे यांच्या वारसाची नोंद फेरफार क्र. १४४७, दिनांक ०७.०४.१९७२ अन्वये मौजे कामतघर येथील सर्व्हे नंबर ४९/२५ व इतर सर्व्हे नंबरवर घेण्यात आली आहे.

विषयांकित फेरफार सुमारे ५३ वर्षापुर्वी निर्णयीत करण्यात आला आहे. सदर नोंद रद्द होऊन प्रदीर्घ कालावधी झाला आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम २५८ प्रमाणे फेरफार नोंदीचे पुनर्विलोकन करणेसाठी कोणतीही नवीन बाब, माहिती किंवा पुरावा निदर्शनास आलेला नाही. त्यामुळे विषयांकित फेरफार नोंद पुनर्विलोकनात घेता येणार नाही किंवा तसा अर्ज देखील दाखल झालेला नाही.

---

**रायगड जिल्ह्यात पशुधन व पाळीव प्राण्यांसाठी सुसज्ज व अद्ययावत शासकीय दवाखान्याची निर्मिती करण्याबाबत**

**(८) ५७७७६ (२१-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने पशुधनासाठी सुरू केलेला फिरता दवाखान्याच्या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून २४ तासानंतरही मदत मिळत नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आपल्या पाळीव प्राण्यावर उपचार घेण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात पशुधन व घराघरामध्ये पाळीव प्राणी असून पाळीव प्राण्यांवर उपचाराकरिता टोल फ्री क्रमांकावर केवळ औपचारिकता म्हणून संवाद साधला जात असून उपचार मिळत नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार उक्त जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात असलेल्या पशुधन व पाळीव प्राण्यांवर उपचार करण्यासाठी ठिकठिकाणी सुसज्ज व अद्ययावत शासकीय दवाखान्याची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०६-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) रायगड जिल्ह्यामध्ये डोंगरी भागात २,२१,७३४ व बिगर डोंगरी भागामध्ये २७,८४० असे एकूण २,४९,५७४ इतके पशुधन घटक आहेत. एकूण पशुधन घटकांचा विचार करता जिल्ह्यामध्ये एकूण ८० पशुवैद्यकीय संस्था असणे अपेक्षित आहे. परंतु सद्य: स्थितीत एकूण १२२ पशवैद्यकिय संस्था व मुख्यमंत्री पशुचिकित्सापथक कार्यरत आहे. याद्वारे पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळापुर व पातुर (जि.अकोला) येथील महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने लक्ष्यांकापेक्षा अतिरिक्त विहिरी मंजूर केल्याबाबत**

**(९) ५९१८० (२१-०४-२०२३). श्री.नितीन भिकनराव देशमुख (बाळापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळापुर व पातुर (जि.अकोला) येथील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (भू.स.वि.यं.) यांनी दिलेल्या लक्ष्यांकापेक्षा १३१४ जास्त विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त लक्ष्यांकापेक्षा किती जास्त विहिरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे तसेच या योजनेंतर्गत मंजूर विहिरींपैकी किती कामे पूर्ण व अपूर्ण अवस्थेत असून अद्यापही सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पूर्ण झालेल्या विहिरींच्या लाभार्थ्यांना किती अनुदान देण्यात आले असून अपूर्ण व प्रगती मधील विहिरींना किती अनुदान देण्यात आले व अतिरिक्त मंजूर विहिरींच्या कामाबाबत अतिरिक्त अनुदानाबाबत मागणी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने (भू.स.वि.यं.) ठरवून दिलेल्या लक्ष्यांकापेक्षा अतिरिक्त विहिरी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संदीपानराव भुमरे (१०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) मनरेगाअंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (भु.स.वि.यं) यांनी अकोला जिल्हयामधील बाळापुर तालुक्यातील ३० ग्रामपंचायतींना ४३१ व पातुर तालुक्यामधील २८ ग्रामपंचायतींना ७७७ अशा एकुण ५८ ग्रामपंचायतींमध्ये १२०८ इतका लक्षांक दिलेला होता आणि उक्त लक्षांकापेक्षा जास्त अनुक्रमे बाळापूरमध्ये ७९१ व पातूरमध्ये ५२३ अशा एकुण १३१४ इतक्या विहिरी यात्रमाणे दोन्ही मिळून एकूण २५२२ विहीरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

| सिंचन विहिरींबाबत | बाळापूर (ग्रा.पं.३०) | पातूर (ग्रा.पं.२८) |
|---|---|---|
| अ) दिलेला लक्षांक | ४३१ | ७७७ |
| पूर्ण कामे | २९२ | ४८१ |
| अपूर्ण कामे | ५ | ६ |
| काम सुरु नाही | १३४ | २९० |
| ब) लक्षांकापेक्षा जास्त | ७९१ | ५२३ |
| पूर्ण कामे | २६९ | २८१ |
| अपूर्ण कामे | १०० | ५० |
| काम सुरु नाही | ४२२ | १९२ |

(३) लक्षांकापेक्षा जास्त विहीरींपैकी बांधकाम पूर्ण झालेल्या अनुक्रमे बाळापूरमधील २६९ पैकी २६५ व पातूरमधील २८१ पैकी २७७ विहिरींसाठी अनुक्रमे रु.६९८.६७ लक्ष व रु.५७६.०८ लक्ष असे एकुण रु.११९४.७५ लक्ष इतके अनुदान देण्यात आलेले आहे. तसेच लक्षांकापेक्षा जास्त विहीरींपैकी बाळापुर व पातुर तालुक्यामध्ये अनुक्रमे ५ व ४ विहीरींचे काम प्रगतीपथावर असून त्यासाठी अनुक्रमे रु.५.५५ लक्ष व रु. ४.५२ लक्ष असे एकुण रु. १०.०७ लक्ष इतके अनुदान देण्यात आलेले आहे. तसेच अपूर्ण विहिरींपैकी वर्ककोड नसलेल्या-खोदकाम झालेल्या परंतु अर्धवट असलेल्या बाळापुर व पातुर तालुक्यामधील अनुक्रमे ९ व ५ असे एकूण १४ विहिरी आणि खोदकाम व बांधकाम झालेल्या बाळापुर व पातुर तालुक्यामध्ये अनुक्रमे ८६ व ४१ विहिरी असे एकूण १२७ विहिरीकरिता रु.१६८.५१ लक्ष इतक्या निधी मागणीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या दिनांक १०.०५.२०२३ अन्वये शासनास प्राप्त झाला आहे.

(४) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने ठरवुन दिलेल्या लक्षांकापेक्षा अतिरिक्त विहिरी मंजुर करणाऱ्या ४ गट विकास अधिकारी, ४ शाखा अभियंता व २४ ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी अशा एकुण ३२ अपचारी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही विभागीय आयुक्त, अमरावती स्तरावर सुरु असून प्रकरणात चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**राज्यात रोजगार हमी योजनेचा लाभ आदिवासी बांधवांना न मिळाल्याबाबत**

**(१०) ५९२८४ (२१-०४-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगार हमी योजनेचा लाभ अद्यापही बहुतांशी आदिवासी बांधवांना न मिळाल्यामुळे तसेच त्यांना शासनाच्या विविध योजनांचा १०० टक्के लाभ मिळत नसल्यामुळे आदिवासींना कुंटूबाच्या उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात खरीप हंगाम संपल्यानंतर हजारो मजूरांचे स्थलांतर होत असल्याने हे स्थलांतर रोखण्याकरिता तातडीने रोजगार हमी योजनेची कामे सुरु करण्याची मागणी तेथील सरपंचांनी तहसिलदारांकडे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात काम नसल्यामुळे उक्त आदिवासींची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असून आदिवासी मुला-मुलींना शिक्षण सोडून देऊन कुंटूबाच्या उदरनिर्वाहासाठी आई-वडिलांना कामात मदत करावी लागत असल्यामुळे त्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी बांधवांच्या अडचणी दूर करण्यासाठी तसेच त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) नाही. अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) हे खरे नाही.

शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या "मिशन झिरो ड्रॉपआऊट" या मोहिमेअंतर्गत दिनांक ०५ ते २० जुलै, २०२२ या कालावधीतील सर्वेक्षणात पालघर जिल्ह्यात शाळाबाह्य, अनियमित, स्थलांतरीत आढळलेल्या मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्यात आले आहे.

(४) मनरेगा योजनेअंतर्गत पालघर जिल्ह्यात सन २०२२-२३ मध्ये १७,५०,२५५/- इतकी मनुष्यदिन निर्मिती झाली आहे. याद्वारे ८०,८१८ इतक्या कुटुंबांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच जिल्हयात ४,९६८ एवढी कामे शेल्फवर ठेवण्यात आली असून त्याची मनुष्यदिन निर्मिती १२,०५,२६६ एवढी आहे.

पालघर जिल्हयामध्ये मनरेगा योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये घरकुल ५,१५९, वृक्ष लागवड ३७१, गोठा ३२२, शेळी शेड ३२, कुक्कुटपालन ८४, शेततळे ६, सिंचन विहिर ७२, शोषखड्डे २१ अशी एकूण ६,०६७ कामे लाभार्थ्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आदिवासी कुटुंबाचे स्थलांतर होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निदेश जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिलेले असून बहुतांशी स्थलांतराचे प्रमाण कमी झाले आहे. जे स्थलांतर होत आहे ते रोजगाराची कामे उपलब्ध होत नसल्याने होत नसून अन्य कारणाने स्थलांतर होत आहे.

शासनाच्या विविध विभागामार्फत जसे की, शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल कल्याण विभाग इ. विभागामार्फत सर्वसाधारण प्रवर्गासाठी ज्याप्रमाणे योजना राबविण्यात येतात, त्याचप्रमाणे आदिवासी भागातही सदर योजना राबविण्यात येतात. अशा योजनांना आदिवासी विकास विभागाकडून पुरक निधी (गॅप फन्डीग) उपलब्ध करून दिला जातो. तसेच अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना विशेष केंद्रीय सहाय्य, भारतीय संविधानाचे अनुच्छेद २७५ (१) योजना, केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना इ. योजनामार्फत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणेसाठी व विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत विविध योजनांचा लाभ देण्यात येतो. पालघर जिल्हयातील आदिवासींचे जीवनमान उंचाविण्यासाठी व इतर गरजा भागविणेकरिता जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना अंतर्गत विविध विभागाच्या योजनांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(५) विलंब झालेला नाही.

---

## जवराबोड (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील रोजगार हमी योजनेत वृक्ष लागवडीच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(११) ६०९२४ (२१-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवराबोड (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायतांतर्गत रोजगार हमी योजनेतील सन २०२०-२०२१-२०२२ या कालावधीत वृक्ष लागवडीच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यास संवर्ग विकास अधिकारी दिरंगाई करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात उक्त अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता सरपंच व उपसंरपच समिती तसेच गावकारी वारंवार संबंधितांकडे मागणी करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) जवराबोडी (ता.चिमुर, जि.चंद्रपूर) येथील मगारोहयो अंतर्गत वृक्ष लागवडी संदर्भात प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने गट

विकास अधिकारी, पं.स. चिमुर यांचेकडून चौकशी करण्यात आलेली असुन चौकशी मध्ये सदर कामात अनियमितता झाल्याचे आढळुन आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) येथे पिक उगवले नसल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याबाबत**

**(१२) ६१०६० (१९-०४-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळा (जि.नाशिक) येथे मका या पिकाचे निकृष्ट बियाणे देण्यात आल्यामुळे मका या पिकाचे बियाणे उगवलेच नसल्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून किती नुकसान भरपाई देण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी बनावट बियाणे विकणाऱ्या कंपन्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (११-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही,
(२) देवळा (जि.नाशिक) तालक्यातील सन २०२२-२३ मध्ये मका बियाणाच्या ६ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या सहा तक्रारीपैकी दोन तक्रारदार शेतकऱ्यांना बियाणे उत्पादन कंपनीकडून मका बियाणे भरपाई म्हणून मिळाल्याने तक्रार मागे घेतली आहे. उर्वरित चार शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रात तालुका तक्रार निवारण समिती, कळवण, जि.नाशिक यांनी भेट दिली असता सविस्तर पहाणीअंती या शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रात खोडकिडा या किडीमुळे, अन्नद्रव्याच्या कमरतेमुळे, तणाचा बंदोबस्त न केल्यामुळे तसेच सततच्या पावसामुळे पाणी साचून मर रोगामुळे नुकसान झाल्याचे आढळून आले. देवळा तालुक्यातील इतर मका उत्पादक शेतकऱ्यांचे अभिप्राय घेण्यात आलेले आहेत. बियाण्याच्या उगवण क्षमतेमुळे नुकसान झाल्याच्या तक्रारी दिसून आल्या नाहीत.
(३) बियाणे निरीक्षक तथा कृषि अधिकारी पंचायत समिती, देवळा, जि.नाशिक यांनी कंपनीस कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने बियाणे कायदा १९६६ अन्वये ॲडव्हान्टा इंटरप्राईजेस, हैद्राबाद या मका बियाणे उत्पादक कंपनीस सक्त ताकीद देण्यात आली आहे. भविष्यात बियाणे कायदा १९६६ चे उल्लघंन झाल्यास सबंधीत बियाणे उत्पादक कंपनीच्या परवान्यावर कठोर कारवाई करण्याबाबत परवाना प्राधिकारी यांना शिफारस करण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर (जि.पुणे ) येथील तहसिलदार रिक्त पदाबाबत**

**(१३) ६१२९६ (२१-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.पुणे) तहसिल कार्यालयामध्ये तहसिलदार हे पद दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास रिक्त असून प्रभारी तहसिलदारांमार्फत कामकाज चालविले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिरुर तालुका हा कृषी व औद्योगिक दृष्टीने व्यापलेला असून तहसिल कार्यालयांत नागरिकांना दाखले, व महसूल खात्याशी अनुषंगिक अनेक कामांकरिता नागरिकांचा महसूल खात्याशी सबंध येत असून प्रभारी तहसिलदार भेटत नसल्याने अनेक नागरिकांना कामांविनाच परतावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल खात्याशी सबंधित अनेक नागरिकांची कामे प्रलंबित असल्याच्या तक्रारीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२८-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) दिनांक ०३.१२.२०२१ पासून तहसिलदार शिरुर, जि.पुणे हे पद रिक्त होते. सदर रिक्त पदावर दिनांक १२.०४.२०२३ च्या शासन आदेशान्वये श्री.बाळासाहेब मस्के, तहसिलदार यांना पदस्थापना देण्यात आली.

तथापि, दरम्यानच्या दिनांक ३१.१२.२०२१ ते ११.०४.२०२३ या कालावधीत तहसिलदार श्रीमती रंजना उंबरहंडे, श्री.प्रशांत पिसाळ व श्री.बालाजी सोमवंशी हे त्यांच्या मूळ पदाचा प्रभार सांभाळून तहसिलदार शिरुर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत होते. तसेच प्रभारी तहसिलदार भेटत नसल्याबाबतच्या कोणत्याही लेखी तक्रारी प्राप्त झाले नसल्याचे जिल्हाधिकारी (महसूल) पुणे यांनी आपल्या अहवालात नमूद केलेआहे.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमार समाजातील लोकांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नसल्याबाबत**

**(१४) ६१८०० (२१-०४-२०२३). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील मच्छीमार खारवी, कोळी, दालदी, भोई समाजातील लोकांना वर्षभर प्रतिक्षा करुनही जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जातीचे प्रमाणपत्र वेळेत न मिळाल्यामुळे शैक्षणिक व शासकीय योजनांच्या सवलतींपासून या समाजातील लाभार्थ्यांना वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी या समाजाच्या जातीच्या प्रमाणपत्रासाठी किती अर्ज व प्रमाणपत्रे प्रलंबित आहेत व यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) रत्नागिरी जिल्हयातील मच्छीमार खारवी, कोळी, दालदी, भोई समाजातील जातीच्या प्रमाणपत्राचे अर्ज व प्रमाणपत्र प्रलंबित नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळग्रस्त मराठवाडा, विदर्भ आणि खान्देश येथील नागरी सेवा संघाच्या भाडोत्री सभासदांना पडिक जागेवर घरे बांधण्याकरिता जमीन उपलब्ध करण्याबाबत**

**(१५) ६३२७० (२१-०४-२०२३). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरात वास्तव्यास असलेल्या दुष्काळग्रस्त मराठवाडा, विदर्भ-खान्देश नागरी सेवा संघाच्या २ हजार बेघर भाडोत्री सभासदांना मौजे खारीगाव व मौजे उत्तरशीव येथील शासनाच्या मोकळया पडीक जमिनीवर घरे बांधण्यासाठी भाडेतत्वावर जमिन देण्यात यावी, अशी मागणी मराठवाडा, विदर्भ-खान्देश नागरी सेवा संघा'च्या वतीने जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयासमोर धरणे आंदोलन करुन माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव ठाणे तहसील कार्यालय येथे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वीही शासनाने रामदेव बाबांच्या पतंजली ट्रस्टला नागपूर येथे आणि तिरुपती बालाजी मंदिरासाठी नवी मुंबई येथे भाडे तत्वावर भूखंड देण्यात आलेला असून त्याच धर्तीवर उक्त संघाच्या सभासदांना शासकीय भूखंड भाडेतत्वावर घर बांधण्यासाठी देण्याची मागणी करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-१०-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे अंशत खरे आहे.

प्रकरणी मंडळ अधिकारी, ठाणे व मंडळ अधिकारी, दहिसर यांनी चौकशी करुन तहसीलदार कार्यालय ठाणे यांचेकडे अहवाल सादर केलेला आहे.
(३) पतंजली आर्युवेद मर्या. या कंपनीला निर्यात उद्योगासाठी, नागपूर येथील मिहान प्रकल्पातील विशेष आर्थिक क्षेत्रात १०६.११ एकर क्षेत्राचा भूखंड, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या जमीन आवंटन धोरणानुसार थेट वाटप पध्दतीने देण्यात आलेला आहे. तर विशेष आर्थिक क्षेत्राबाहेर पतंजली फुड ॲण्ड हर्बल पार्क नागपूर या कंपनीला ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन सुमारे २३४ एकरचा भूखंड अन्न व फळ प्रक्रियेवर आधारीत उद्योगासाठी आवंटीत करण्यात आला आहे.

नवी मुंबई मधील शहर पातळीवरील सुविधा (सिटी लेवल फॅसिलिटी) म्हणून विशेष प्रकल्पाअंतर्गत श्री व्यंकटेश्वराचे मंदीर उभारणीसाठी एक विशेष बाब म्हणून शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.सिआयडी-१८२२/५७२/प्र.क्र.७०/नवि-१०, दिनांक ०५.०५.२०२२ अन्वये भाडेपट्टयाने तिरूमल्ला तिरुपती देवस्थान बोर्ड यांना थेट वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) खाजगी सेवा संघाच्या बेघर व भाडोत्री राहणाऱ्या सभासदांना घरे बांधण्यासाठी भाडेतत्वावर जमीन देण्याबाबत सद्य:स्थितीत कोणतीही कायदेशीर अथवा धोरणात्मक तरतूद नाही, तथापी, प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुकूल कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वन विभागातील विभागीय वन अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) ६४५६१ (२४-०८-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वन विभागात मागील तीन वर्षांपासून सहाय्यक वन संरक्षकांना बढती न दिल्यामुळे बढतीने भरली जाणारी विभागीय वन अधिकाऱ्यांची ५५ पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे वनविभागातील विकास कामे प्रलंबित असून कामाचा ताण वाढलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभागात आकृतीबंधानुसार अंमलबजावणी करुन रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-१०-२०२३) :** (१) होय, विभागीय वन अधिकारी संवर्गात १०९ पदे मंजूर आहेत. महसूल व वन विभागाच्या दिनांक ३१.०७.२०२३ व दिनांक ०४.०८.२०२३ रोजीच्या आदेशान्वये ७७ विभागीय वन अधिकारी संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. सध्या मंजूर १०९ पदांपैकी ०२ पदे रिक्त आहेत.
(२) नाही, प्रश्न उपस्थित होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरु न करण्याबाबत**

**(१७) ६४७०४ (२४-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर असेल त्या टप्प्यावर दिनांक ३० जून, २०२३ पर्यंत पुढे ढकलण्यात येत असल्याबाबत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दिनांक २३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास आदेश निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बँकिंग नियमन अधिनियमचे कलम ११ मधून बँक बाहेर येईपर्यंत निवडणूक प्रक्रिया सुरु न करता प्रशासक कायम ठेवण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरु न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०६-१०-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) दिनांक २८ जून,२०२३ रोजीच्या आदेशान्वये २५० किंवा त्यापेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच, ज्याप्रकरणी मा.सर्वोच्च / मा.उच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेशीत केले आहे अशा सहकारी संस्था तसेच ज्या संस्थांची निवडणूक प्रक्रिया पुर्ण झाली आहे परंतु, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड होणे बाकी आहे अशा संस्था वगळून, राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर दिनांक ३० सप्टेंबर,२०२३ पर्यंत पुढे ढकलण्यात आल्या असल्याने सदर बँकेची निवडणूक सुरू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि. ठाणे) व वाडा (जि. पालघर) या तालुक्यातील ५०५४ जनजाती अंतर्गत मंजूर विकासकामांना देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत**

**(१८) ६४९३० (१०-१०-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाच्या लेखाशीर्ष जनजाती क्षेत्र ५०५४ अंतर्गत माहे मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पामध्ये ५०५४ या लेखाशीर्ष अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामांपैकी निविदा न काढलेल्या कामांना २० जुलै, २०२२ च्या शासन निर्णयानुसार प्रथम स्थगिती देण्यात आली होती, तद्नंतर रस्ते व पुलांच्या कामापैकी जिल्हा ठाणे येथील शहापूर तालुक्यातील ६८ कामे व पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील १४ कामे जनजाती क्षेत्र ५०४५ अंतर्गत मंजूर केलेली कामे दिनांक ३ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शासन निर्णयानुसार मंजूर कामे अचानक रद्द करण्यात आल्यामुळे दोन्ही तालुक्यातील विकास खुंटणार असून सुशिक्षित बेरोजगार व तेथील मजूर कामगार तसेच ठेकेदारांवर उपासमारीची वेळ आल्यामुळे शहापूर व वाडा या आदिवासी तालुक्यातील रस्ते व पुलांची कामे होणार नसल्याने तेथील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१९-१०-२०२३) :** (१) लेखाशिर्ष ५०५४ ५११७ अंतर्गत निविदा प्रक्रिया न केलेली शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील ६७ कामे व वाडा (जि. पालघर) तालुक्यातील २४ कामे दिनांक ०३/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आली आहेत.
(२) अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२३ मध्ये नवीन कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यामध्ये पालघर जिल्ह्यासाठी रु.१५९.२१ कोटी इतक्या रकमेची ३१७ कामे घेण्यात आली असून त्यामध्ये वाडा तालुक्यातील रु.१०.७९ कोटी रकमेच्या ९१ कामांचा समावेश आहे. तसेच, ठाणे जिल्ह्यासाठी रु.७२.७० कोटी इतक्या रकमेची १५७ कामे घेण्यात आली आहेत, त्यामध्ये शहापूर तालुक्यातील रु.५० लक्ष रकमेच्या १ कामाचा समावेश आहे. सदर कामांना निधीची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच, पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये नवीन कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यामध्ये पालघर जिल्ह्यासाठी रु.१६५.९५ कोटी इतक्या रकमेची ३६६ कामे घेण्यात आली असून त्यामध्ये पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील रु.१२.३० कोटी रकमेच्या ८६ कामांचा समावेश आहे. सदर कामांना निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निफाड व मालेगाव (जि.नाशिक) येथील तहसिल कार्यालयातील कामाचा अतिरिक्त ताण कमी करण्याकरिता अप्पर तहसिल कार्यालये निर्माण करण्याबाबत

**(१९) ६५३६४ (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात सद्याच्या तहसिल कार्यालयांमधील कामकाजाचा आढावा घेवून आवश्यकतेनुसार स्वतंत्र अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्याची आवश्यकता आहे का याची तपासणी करून शासनाला प्रस्ताव सादर करण्याचे महसूल विभागाने जिल्हाधिकारी नाशिक यांना माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,निफाड तहसिल कार्यालयातील कामाचा अतिरिक्त ताण कमी करण्यासाठी लासलगाव येथे स्वतंत्र अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे दिनांक २१ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री महाराष्ट्र यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी नाशिक यांनी जिल्ह्यात अप्पर तहसिल कार्यालयांची निर्मिती करण्यासाठी शासनास प्रस्ताव पाठवला आहे काय,
(४) असल्यास, उक्त जिल्ह्यातील निफाड, नाशिक व मालेगाव तहसिल कार्यालयांमधील कामाचा अतिरिक्त ताण कमी करण्यासाठी अप्पर तहसिल कार्यालय निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१०-१०-२०२३) :** (१) राज्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये वाढलेली लोकसंख्या, तालुक्यातील दूरच्या भागातील जनतेस तातडीने व नजिकच्या ठिकाणी सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच सध्याच्या तहसिल कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार स्वतंत्र अपर तहसिल कार्यालय निर्माण करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत सखोल तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत सर्व विभागीय आयुक्त यांना शासनाच्या दिनांक १९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.
(२) होय.

(३) लासलगाव, ता.निफाड, जि.नाशिक येथे अपर तहसील कार्यालय निर्माण करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.
(४) अपर तहसिल कार्यालय निर्मितीबाबत विभागाच्या प्रचलित पध्दतीनुसार संबंधित विभागीय आयुक्तांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर विभागाचे मा.मंत्री व मा.मुख्यमंत्री यांची तत्वत: मान्यता घेवून प्रस्तावास वित्त विभागाने गठित केलेली उप समिती व त्यांनी केलेल्या शिफारशीनुसार उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्यात येते. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर अपर तहसिल कार्यालयाचे कार्यक्षेत्र व पदनिर्मितीबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येतो.

नाशिक जिल्ह्यातील लासलगाव, नाशिक व मालेगाव येथे अपर तहसील कार्यालय स्थापन करणेबाबत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे. तसेच, महसूली कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात फेरबदल / नवीन कार्यालय निर्मिती याबाबत शिफारशी करण्याकरीता सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिका-यांची समिती गठित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील तहसीलदार यांना महसूल अतिरिक्त सचिव यांच्या आदेशानुसार निलंबित करण्यात आल्याबाबत

**(२०) ६५३७९ (३१-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तहसीलदार तृप्ती कोलजे यांना महसूल अतिरिक्त सचिव संजीव राणे व डॉ.माधव वीर यांच्या आदेशानुसार निलंबित करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हडपसर येथील वन जमीन तत्कालीन मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाची खातरजमा न करता संबंधित अर्जदाराला प्रदान करणे या गुन्ह्याबरोबर अन्य कोणकोणत्या बाबतीत वित्तीय अनियमितता केल्याचे तसेच नियमबाह्य पद्धतीने काम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या-ज्या बाबी निदर्शनास आल्या त्याबाबत कर्तव्यात कसूर व पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात कोणकोणत्या कारवाया करण्यात आल्या व येत आहेत,
(४) असल्यास, वन जमीन अर्जदारांना परत करणे, कोरोना काळात जीवनावश्यक वस्तूंची खरेदी आवश्यक सेवा-सुविधा यामध्ये वित्तीय अनियमितता आढळून येऊन सुद्धा त्यांची पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाच्यामार्फत चौकशी न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०९-२०२३) :**(१) श्रीम. तृप्ती कोलते, तत्का. तहसिलदार, हवेली यांना शासनाच्या मान्यतेने दिनांक ०९.१२.२०२३ च्या आदेशाने सेवेतून निलंबित करण्यात आले होते.
(२) होय, खरे आहे.
(३) ते (५) शासन ज्ञापन दिनांक १९.०४.२०२३ अन्वये श्रीमती कोलते यांच्याविरुध्द विभागीय चौकशी अंतर्गत दोषारोपपत्र बजावण्यात आले असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना व महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी सन्मान योजनेंतर्गत कर्जमाफी मिळाली नसल्याबाबत

**(२१) ६५४७२ (२८-०८-२०२३). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आकोली, घारोड, निरोड, लोखंडा, पाळा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) या गावातील शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेंतर्गत लाभ मिळाला नसल्याची तक्रार उपविभागीय अधिकारी व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांना प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीवरुन उपविभागीय अधिकारी व सहाय्यक निबंधक यांनी कर्जमाफीतून सुटलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीत सामावून घेण्याबाबत कार्यवाही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे सदर शेतकऱ्यांचे कर्ज वाढत असून सततच्या नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळाला नाही त्यांना शासन कर्जमाफी योजनेत सामावून घेणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१९-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) मौजे आकोली, घारोड, निरोड, लोखंडा, पाळा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) या गावांतील एकुण २३०० शेतकऱ्यांची कर्जखाती महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली होती. त्यापैकी १४१२ शेतकऱ्यांना योजनेअंतर्गत लाभ देण्यात आला असून उर्वरीत पात्र असलेल्या ८८८ शेतकऱ्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

त्याचप्रमाणे मौजे आकोली, घारोड, निरोड, लोखंडा, पाळा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) या गावांतील एकुण ५८४५ शेतकऱ्यांची कर्जखाती छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ या योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली होती. त्यापैकी एकुण २८१४ शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला असून उर्वरीत पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुमसर (जि.भंडारा) येथे रासायनिक खतांची उचल करण्यासाठी रॅक पॉईंट निर्माण करण्याबाबत

**(२२) ६५५४४ (२७-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) येथे रासायनिक खतांची उचल करण्यासाठी रॅक पॉईंट नसल्यामुळे रॅक पॉईंट निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथे शेतकऱ्यांना फायदा होणार असून मोठा दिलासा मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन सदर रॅक पॉईन्ट निर्माण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) तुमसर टाऊन रेल्वे स्टेशन येथे रेल्वे रेक पॉईंट करीता काही पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बार्शीटाकळी (जि.अकोला) तालुक्यात अनुसूचित जमातीचे बनावट दाखले आढळून आल्याबाबत

**(२३) ६५५७७ (१०-१०-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बार्शीटाकळी (जि.अकोला) तालुक्यात आदिवासी बहुल भागात बनावट अनुसूचित जमातीचे दाखले आढळून आले असून हे दाखले सर्रासपणे घरकुल योजनांचा लाभ घेण्यासाठी वापरले जात असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दाखल्यांवर उपविभागीय अधिकारी, मूर्तिजापूर यांचा शिक्का तसेच उपविभागीय अधिकारी, अकोला यांची बनावट सही आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बनावट दाखले देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२५-१०-२०२३) :** (१) व (२) बार्शीटाकळी (जि.अकोला) तालुक्यात आदिवासी बहुल भागात बनावट अनुसूचित जमातीचे दाखले आढळून आले असून हे दाखले सर्रासपणे घरकुल योजनांचा लाभ घेण्यासाठी वापरले जात असल्याबाबतची बातमी दिनांक ०९.०५.२०२३ रोजीच्या दैनिक लोकमत मध्ये प्रसिध्द झाली होती.

गटविकास अधिकारी, बार्शीटाकळी यांच्या अहवालानुसार घरकुल योजनेचे लाभ घेण्याकरीता अनुसूचित जमातीचे बनावट दाखले वापरल्याबाबत त्यांच्या कार्यालयाकडे एकही प्रकरण आढळून आलेले नाही. तसेच उपविभागीय अधिकारी, मुर्तिजापूर यांचे कार्यालयांतर्गत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शीटाकळी तसेच मुख्याधिकारी, नगर पंचायत, बार्शीटाकळी यांच्या कार्यालयात देखील बनावट दाखले आढळून आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात शासनाकडून वन विभागास अपेक्षित निधी प्राप्त झाला नसल्याबाबत

**(२४) ६५७०५ (२७-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवीन शासन येऊन ८ ते ९ महिन्याचा कालावधी उलटून गेला असतानाही वन विभागाला अपेक्षित असा निधी देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाकडून बरीच कामे पावसाळ्यापूर्वी करुन घेणे आवश्यक असूनही निधीच्या कमतरतेमुळे ही कामे पूर्ण करता येत नसल्याने नवीन कामे सुरु करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने वन विभागाला आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही,
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासनाने नऊ सहकारी साखर कारखान्यांना कर्ज हमी दिली असून उर्वरित कर्ज देण्यात आले नसल्याबाबत

**(२५) ६६२३३ (२४-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने नऊ सहकारी साखर कारखान्यांना रुपये १०२३ कोटी रुपयांच्या कर्जाची हमी दिली असून उर्वरित कर्ज देण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त सर्व सहकारी साखर कारखान्यांना कर्जहमी देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-१०-२०२३) :** (१) नाही.

साखर आयुक्तालयाचे दिनाक १६.०२.२०२३ व १७.०२.२०२३ रोजीचे पत्रान्वये ०९ सहकारी सहकारी साखर कारखान्यांचे रु.१,०२३.५७ कोटी व दिनांक ३०/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये ०५ सहकारी साखर कारखान्यांचे रु.८२५ कोटी असे एकूण रु.१,८४८.५७ कोटी एवढया रकमेचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले होते. तथापि, राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through State Government) खेळत्या भांडवलासाठी मार्जिन मनी लोन उपलब्ध करुन देणेसाठी शासन निर्णय दि.०४/०५/२०२३ अन्वये मा. मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात येवून उक्त योजनेअंतर्गत कर्ज उपलब्ध करुन देणेसाठी सुधारीत कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

शासनाचे दिनांक ०८/०५/२०२३ रोजीचे पत्रान्वये शासन निर्णयातील अटी व शर्तीं नुसार उक्त प्रस्ताव तपासून सादर करणेसाठी साखर आयुक्तालयास कळविण्यात आले. त्यानुसार उपरोक्त कारखान्यांचे पूर्वी दाखल करण्यात आलेले सर्व प्रस्ताव दप्तरी दाखल करुन कारखान्यांनी शासन निर्णय ०४/०५/२०२३ मधील अटी व शर्तींनुसार संबंधीत सहकारी साखर कारखाना पात्र असल्यास नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले.
(२) नाही.
मा. मंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळ उपसमितीने दिनांक ३०/०५/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये ज्या सहकारी साखर कारखान्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते अशा पात्र ०६ सहकारी सहकारी साखर कारखान्यांना सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभागाच्या दिनांक ३/०८/२०२३ च्या शासन निर्णयान्वये रु.५४९.५४ कोटी रकमेचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. तसेच कोणत्याही पात्र सहकारी साखर कारखान्यांचे प्रस्ताव वगळण्यात आलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात नाथपंथी डवरी गोसावी समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत**

**(२६) ६६४३४ (२४-०८-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नाथपंथी डवरी गोसावी या अल्प समाजातील बरेच लोक अज्ञानी असून त्यांच्याकडे उपजिवीकेचे साधन नसल्याने पारंपारिक भिक्षुकी व्यवसाय करीत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी, गोंधळी व भराडी समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी या समाजाच्या शिष्टमंडळाने शासनाला केली असल्याची माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समाजातील लोकांचा मानव विकास निर्देशांक खूप कमी असून लोक अद्यापही उच्च शिक्षित नसल्याने त्यांना शासनाच्या योजनांची माहिती नाही, तसेच बहुतांश लोक दारिद्र्यरेषेखालील असून समाजातील लोकांकडे उपजिविकेचे व उत्पन्नाची साधने नसल्याने लोक पारंपारिक व्यवसाय म्हणजे भिक्षा मागणे, जागरण गोंधळ घालणे, डवर वादन तसेच भराडी घालणे इत्यादी व्यवसाय करून जीवन जगत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या समाजाचा वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती आर्थिक विकास महामंडळात समावेश असून यामध्ये एकूण २८ ते २९ जातीचा समावेश असल्याने नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी, गोंधळी, भराडी समाजापर्यंत या योजना पोहोचत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त समाजास प्रगतीपथावर आणण्याकरीता आसाम राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात नाथपंथी डवरी समाजाच्या विकासासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१९-१०-२०२३) :** (१), (२) व (३) राज्यातील नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी, गोंधळी समाजाची स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची मागणी जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत शासनास प्राप्त झाली आहे.

(४) हे, खरे नाही.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कर्ज योजनेंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती अंतर्गत येणाऱ्या ५१ जाती ४३ उपजातीतील समाजाला तसेच नाथजोगी, नाथपंथी, डवरी गोसावी व गोंधळी इत्यादी जातींना व उपजातींना महामंडळाच्या प्रादेशिक व जिल्हा कार्यालयामार्फत विविध कर्ज योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

(५) व (६) नाथपंथी समाज हा भटक्या जमाती प्रवर्गामध्ये मोडतो. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उत्थानासाठी शासन निर्णय दिनांक ०८ फेब्रुवारी, १९८४ रोजी कंपनी कायदा, १९५६ नुसार वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. या महामंडळाच्या राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयातून विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या उत्थानाच्या योजनां विषयक कामकाज हाताळण्यात येते. त्यामुळे नाथपंथी समाजाच्या विकासासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मासेमारी व्यवसायात क्रियाशील महिलांची मच्छिमार म्हणून नोंद घेऊन विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबत

**(२७) ६६४८२ (२४-०८-२०२३). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मासेमारी व्यवसायात क्रियाशील महिलांची मच्छिमार म्हणून नोंद घेण्यात येत नसल्याने त्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या कोणत्याही योजनांचा लाभ घेता येत नसल्याचे माहे मे, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने क्रियाशील मच्छिमार महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी मच्छिमार महिलांची नोंदणी करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र व राज्य शासनाकडून सन २०१५-१६ ते २०१९-२० दरम्यान निलक्रांती योजना राबविण्यात आली. महिला सबलीकरणाच्या पार्श्वभूमीवर योजनेअंतर्गत महिला लाभार्थ्यांना ६० टक्के अनुदान देण्यात आले होते. त्यानुसार निलक्रांती योजनेचा ५११ महिलांना लाभ देण्यात आलेला आहे.

तद्नंतर प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना केंद्र शासनाकडून २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीसाठी मंजूर करण्यात आली. सदर योजना केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजना लाभार्थीनिहाय चार प्रवर्ग करण्यात आले असून, प्रवर्गानुसार महिला लाभार्थ्यांस ६० टक्के अनुदान देण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत आजमितीपर्यंत ३३३७ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिलेला असून, त्यामध्ये २०५१ महिला लाभार्थींना समावेश आहे. त्यानुसार या योजनेंतर्गत महिला लाभार्थी वर्गास संबंधित घटकाखाली त्याच्या प्रकल्पाच्या प्रगतीनुसार अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मच्छिमारांना बोटींच्या दुरुस्तीकरिता अनेक वर्ष योजनेचा लाभ न मिळाल्याबाबत

**(२८) ६६६२४ (२४-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मच्छिमारांना बोटीच्या दुरुस्तीकरिता एन.सी.डी.सी. मार्फत अनेक वर्ष योजनेचा लाभ न मिळाल्यामुळे मच्छिमारांनी वैयक्तिक कर्ज घेऊन बोटींची दुरुस्ती करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०२३) :** (१) व (२) राष्ट्रीय सहकार विकास निगममार्फत (NCDC) मच्छीमार सहकारी संस्थांच्या सभासदांना मासेमारी यांत्रिक नौका व बर्फ कारखाने व शितगृह उभारणे, ट्रक, टेम्पो/डिझेल टँकर खरेदी, गोदामाचे बांधकाम इ. साठी अर्थसहाय्य देण्याची योजना शासनाच्या माध्यमातून राबविली जाते. मच्छिमारांना बोटींच्या दुरूस्तीकरिता अर्थसहाय्य/कर्ज देणे याप्रकारची कोणतीही योजना राष्ट्रीय सहकार विकास निगममार्फत राबविली जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील कोळी महादेव, कोळी मल्हार, कोळी ढोर, आणि टोकरे कोळी सहित अन्यायग्रस्त सर्व ३० ते ३२ जमातींना अनुसूचित जमातीच्या सर्व सवलती मिळण्याबाबत**

**(२९) ६६६६१ (०१-०९-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राज्यातील एकूण ४५ आदिवासी जमातींना अनुसूचित जमातीच्या यादी मध्ये समाविष्ट केले आहे. त्यापैकी केवळ १२ ते १५ जमाती आदिवासी क्षेत्रामध्ये (TSP) रहात असून उर्वरित ३० ते ३३ जमाती आदिवासी क्षेत्राबाहेर (OTSP) राहतात. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी क्षेत्राबाहेर (OTSP) वास्तव्य करणाऱ्या कोळी महादेव, कोळी मल्हार, कोळी ढोर, आणि टोकरे कोळी सहित ३० ते ३३ जमाती अनुसूचित जमातीच्या सर्व सवलती पासून अद्यापही वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील कोळी महादेव, कोळी मल्हार, कोळी ढोर, आणि टोकरे कोळी सहित अन्यायग्रस्त सर्व ३० ते ३२ जमातींना अनुसूचित जमातीच्या सर्व सवलती देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे आदिवासी विकास मंत्री यांचेकडे दिनांक १ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अन्यायग्रस्त सर्व जमातींना अनुसूचित जमातीच्या सर्व सवलती देण्याबाबतची कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२५-१०-२०२३) :** (१) केंद्र शासनामार्फत वेळोवेळी अनुसूचित जमातीच्या याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्यासाठीच्या यादीमध्ये एकूण ४५ मुख्य अनुसूचित जमातीचा समावेश आहे. राज्यातील एकूण ४५ जमातींपैकी बहुतांश जमाती या आदिवासी क्षेत्रामध्ये (TSP) तसेच आदिवासी क्षेत्राबाहेर (OTSP) मध्ये राहत आहेत.

दिनांक १८ सप्टेंबर, १९७६ च्या अधिसुचनेपर्यंत राज्यामध्ये काही जमातींसाठी क्षेत्रबंधन निश्चित करण्यात आलेले होते. केंद्र शासनामार्फत दिनांक १८ सप्टेंबर, १९७६ च्या अधिसूचनेद्वारे क्षेत्रबंधन शिथील करण्यात आले.

केंद्र शासनाच्या दिनांक २२ मार्च, १९७७ च्या पत्रानुसार अनुसूचित जमातीच्या व्यक्तीने त्यांच्या मूळ क्षेत्राशी आप्तभाव सिध्द करणे आवश्यक आहे असे स्पष्ट करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व सदर अधिनियम अंतर्गत पारीत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३", दिनांक ०४.०६.२००३ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची व त्याच्या पडताळणीची कार्यवाही करण्यात येते. सदर अधिनियमातील / नियमातील तरतुदी या सर्व अनुसूचित जमातींना लागू आहेत.

उक्त अधिनियमातील कलम ३ नुसार अनुसूचित जमातीसाठी असणारे लाभ मिळण्यासाठी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच उक्त अधिनियम, २००० मधील कलम ८ नुसार अर्जदार ज्या जमातीचे किंवा वर्गाचे आहे हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदार व्यक्तीवर असते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

### राज्य शासनाच्या ई-पीक पाहणी पोर्टलवर विहिर व कूपनलिका यांच्या नोंदी बंद झाल्याबाबत

**(३०) ६६९०५ (२५-०८-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांनी स्वत:ची पीक पाहणी नोंद करावी यासाठी बनविण्यात आलेल्या ई-पीकपाहणी पोर्टलवर सध्या विहिर आणि कूपनलिका नोंदीचा पर्याय बंद झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिणामी आता विहिर व कूपनलिका घेतलेल्या शेतकऱ्यांना वीज जोडणीसाठी अर्ज करताना नोंदीच्या अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाने ही नोंद तलाठी कार्यालयात करुन हस्तलिखीत उतारा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२५-०९-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

ई-पीक पाहणी मोबाईल ॲपमध्ये विहीर आणि कुपनलिका यांची नोंद घेण्याकरिता कायम पड या पर्यायांतर्गत विहीर आणि कुपनलिका नोंद घेणेकरिता उपलब्ध करून देण्यात आलेले आहे व ती सुरू आहेत.

ई-पीक पाहणी प्रकल्प राज्यात सुरू झाल्यापासून विहीर व कुपनलिका नोंदीचा पर्याय सुरूच आहे. त्यामुळे वीज जोडणीसाठी अर्ज करताना अडचणी येण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे नोंद करण्याची सुविधा उपलब्ध असल्याने हस्तलिखीत उतारा देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दापोली (जि. रत्नागिरी) तालुक्यातील हर्णे बंदरावर सुसज्ज व अत्याधुनिक मत्स्यव्यवसाय जेट्टी उभारण्याबाबत

**(३१) ६७०८१ (२४-०८-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि. रत्नागिरी) तालुक्यातील हर्णे हे मच्छीमारी व्यवसायासाठी जिल्हयातील क्रमांक २ चे बंदर असून या बंदरात तब्बल ३ हजारांहून अधिक नोंदणीकृत नौकासह रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील असंख्य मच्छीमारी बोटींद्वारे पकडून आणलेली मासोळी किनाऱ्यावर आणण्यासाठी सदर बंदरावर सुसज्ज मत्स्यव्यवसाय जेट्टीची सुविधाच नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्राच्या आत किनाऱ्यापासून सुमारे दीडशे ते दोनशे मीटर अंतरावर उभ्या करण्यात आलेल्या बोटीमध्ये इंधन, धान्य, बर्फ, जाळी इ. सामान घेवून जाताना मच्छीमारांना त्रासदायक होऊन वेळेचा तसेच पैशाचा अपव्यय होत असल्यामुळे मच्छीमार व्यवसायिक संघटना, मच्छीमार सहकारी संस्थांनी सातत्याने हर्णे बंदर येथे अत्याधुनिक व सुसज्ज जेट्टी उभारण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन मा. मुख्यमंत्री व मत्स्यव्यवसाय मंत्री महाराष्ट्र राज्य तसेच संबंधित अधिकाऱ्याकडे देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हर्णे येथील अत्याधुनिक व सुसज्ज मत्स्यव्यवसाय जेट्टी उभारण्याकरीता सातत्याने निवेदने देऊन पाठपुरावा व अनेक वेळा बैठकाही घेण्यात येवूनही याप्रकरणी कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी व पाहणी करून हर्णे बंदरावर सुसज्ज व अत्याधुनिक मत्स्यव्यवसाय जेट्टी उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे. तथापि हर्णे, ता.दापोली येथील बंदराचे काम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३/१०/२०२० रोजी तत्कालिन मा.मंत्री, मत्स्यव्यवसाय यांना दिलेले निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

हर्णे बंदर विकसित करणेबाबत मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत विकास निधी (FIDF) योजनेंतर्गत करण्याबाबत केद्र शासनाने दिनांक २२/०८/२०२२ व राज्य शासनाने ६/०६/२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

सदरील काम महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आले असून पर्यावरण पूरक परवानगीकरिता रू.४.१९ कोटी इतका निधी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना वितरीत केला आहे. त्यानुषंगाने पर्यावरण विषयक ना हरकत दाखले प्राप्त करून घेण्यासाठी MCZMA च्या १६६ व्या बैठकीत घेण्यात आले असून बैठकीच्या इतिवृत्तामध्ये वरील प्रकल्प SEIAA Authority पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे शहराजवळील कळवा कारगील कोंडा भागातील अतिक्रमित वन जमिनीवरील ४७५ अनधिकृत झोपड्या तोडल्याबाबत

**(३२) ६७६२७ (२९-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहराजवळील कळवा कारगील कोंडा भागातील अतिक्रमित वन जमिनीवरील ४७५ अनधिकृत झोपड्या दिनांक १६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास तोडण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेल्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होऊ नये याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत/प्रस्तावित आहेत:

१. वनपाल, वनरक्षक यांच्यासह SRPF तुकडीच्या सहाय्याने नियमित गस्त घालण्यात येत आहे.

२. वन जमिनीवरील अतिक्रमणांना संबंधीत यंत्रणांकडून नागरी सुविधा (वीज, पाणी, रस्ते इ.) पुरविण्यात येत असल्याने सदर नागरी सुविधा अतिक्रमणधारकांना पुरविण्यात येऊ नये, याबाबत सर्व संबंधित विभागांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

३. वनक्षेत्राभोवती प्राथमिक स्वरुपात तारेचे कंपाऊंड करण्यात येत आहे. कायमस्वरुपी RCC संरक्षक भिंत बांधण्याचे प्रस्तावित आहे.

४. अतिक्रमण निष्कासनानंतर मोकळया करण्यात आलेल्या क्षेत्रावर वनीकरण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लखाड (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथील बँक ऑफ महाराष्ट्राने शेतकऱ्यांच्या फिक्स डिपॉजिटमधून परस्पर कर्ज वसुली केल्याबाबत

**(३३) ६७८११ (२८-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार**

**(ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लखाड (ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती) येथील रमेश गणपत साखरे या शेतकऱ्यांच्या खात्यातून बँक ऑफ महाराष्ट्राने परस्पर कर्ज वसूली केल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांने जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून या प्रकरणाची तक्रार करुनही अमरावती जिल्ह्यातील बँकामार्फत शेतकऱ्यांना शासनामार्फत मिळणाऱ्या अनुदानातून कर्जाची रक्कम कपात केल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने दखल घेवून येथील बँक व्यवस्थापनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१९-१०-२०२३) :**(१) होय.

(२) नाही. सदर शेतकऱ्याने लखाड सेवा सहकारी संस्था मर्या. लखाड या संस्थेकडून घेतलेल्या रु.४९,२१८/- इतक्या कर्ज रकमेस कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. तथापि सदर शेतकऱ्याने बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा तरडगाव कडून रु.१ लाख इतके कर्ज घेतले होते व सदर कर्जखाते NPA झाले होते.

सदर कर्ज वितरीत करताना थकीत कर्जदार व बॅंक ऑफ महाराष्ट्र यांच्यातील करारनाम्यावर Right to set of चा उल्लेख करण्यात आलेला होता. त्यामुळे सदर शेतकऱ्याने कर्जाची परतफेड न केल्याने, बॅंकेने मुदतठेव खाते थकीत कर्जास Right to set of अंतर्गत जोडल्याचे संबंधीत शेतकऱ्यास कळविले व त्यानंतरच मुदत ठेव खात्यातील रक्कम वळती केली.

सदर शेतकऱ्याच्या कर्जखात्यात मुदत ठेव रक्कम वळती केली ही बाब खरी असली तरी, त्याबाबत कर्जदारास अवगत करण्यात आले होते. कर्जदाराने बॅंकेचे कर्ज थकीत ठेवून रु.२ लाख मुदतठेवी मध्ये बॅंकेत गुंतविले ही बाब अभिलेखांवरून स्पष्ट होते. कर्ज रक्कम मुदतठेवीतून वळती केलेली आहे. सदर रक्कम ही कोणत्याही अनुदानाची नव्हती.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती येथे कृषी विभागाच्या ३६ कार्यालयांना स्वमालकीची इमारत नसल्याबाबत

**(३४) ६७८४८ (२४-०८-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे कृषी विभागाची एकूण ८१ कार्यालये असून त्यातील ३६ कार्यालयांचा कारभार भाड्याच्या इमारतींमधून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील अधिकारी व कर्मचारी व कामानिमित्त येणाऱ्या शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेवून येथील सदरील कार्यालयांना हक्कांच्या इमारती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०५-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

अमरावती विभागांतर्गत कृषि विभागाची एकूण ८५ कार्यालये असून त्यापैकी ४८ कार्यालये शासकीय इमारतीमध्ये कार्यरत आहेत. तसेच ३७ कार्यालये भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. शासकीय इमारतीमध्ये असलेली कार्यालये ही मुख्यत: फळरोपवाटीका, तालुका बिज गुणन प्रक्षेत्र येथे प्रस्थापित आहेत. त्यापैकी काही प्रक्षेत्र नागरी वस्तीपासून लांब असून उपलब्ध इमारतीमध्ये कार्यालये स्थापन करण्यात आलेली आहेत.
(२) तथापि, यामुळे अधिकारी/कर्मचारी व कामानिमित्त येणाऱ्या शेतकऱ्यांची अडचण होणार नाही याबाबतची काळजी घेण्यात येत आहे.
(३) सद्यस्थितीत कृषि विभागातील इमारत बांधकाम करण्यासाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात अत्यल्प निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे कृषि विभागाची जी कार्यालये सद्या भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत त्या सर्वच कार्यालयांना इमारत बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देणे शक्य नाही. कृषि विभागातील इमारत बांधकामासाठी उपलब्ध निधी व संबंधित ठिकाणी कार्यालयीन इमारत बांधकामाची निकड विचारात घेऊन इमारत बांधकामाची कार्यवाही या विभागाकडून करण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध झाल्यास इमारत बांधकामाची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धाराशिव शहरातील शासकीय दूध योजना परिसरामधील जागेवर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्याबाबत

**(३५) ६७९७८ (२४-०८-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव शहरातील स.नं ४२६ मधील शासकीय दूध योजना डेअरी परिसरामधील जागेवर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जागा उपलब्ध व्हावी याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्यामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोकनेते स्व.गोपीनाथजी मुंडे, माजी उपमुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री यांचे छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारण्यास शासकीय दूध योजना, छत्रपती संभाजीनगर येथील भूमापन क्रमांक १३७८९ मधील जागा हस्तांतरित करण्यात आलेली आहे त्याचधर्तीवर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्याकरिता शासकीय दूध योजना डेअरी परिसरामधील १ एकर जागा हस्तांतरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी प्रधान सचिव, दुग्धव्यवसाय विभाग यांच्याकडे दिनांक २३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-१०-२०२३) :**१) हे खरे नाही.

(२) व (३) होय.

(४) शासन निर्णय दिनांक ११/११/२००२ नुसार बंद पडलेल्या शासकिय दूध योजनांची जागा मालमत्ता फक्त जिल्हा/तालुका सहकारी संघांना देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अर्जुनी-मोरगा (जि.गोंदिया) तालुक्यातील गोठणगाव वनपरिक्षेत्रांर्गत गंधारी व जांभळी वनातून झालेल्या अवैध सागवन वृक्षतोडीबाबत

**(३६) ६८०८२ (२९-०८-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी-मोरगा (जि.गोंदिया) तालुक्यातील गोठणगाव वनपरिक्षेत्रांतर्गत गंधारी व जांभळी वनातुन मौल्यवान सागवान वृक्षाची अवैध वृक्षतोड करुन परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सात महिन्यापासून सुरु असलेल्या अवैध वृक्षतोडीचे काही माध्यमाद्वारे प्रसिद्ध होताच संबंधित अधिकारी झाडे कापण्याकरिता परवानगीच्या कागदपत्रांची जुळवा-जुळव करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अवैध सागवन वृक्षतोड प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-१०-२०२३) :** (१) अर्जुनी मोरगाव (जि. गोंदिया) तालुक्यातील गोठणगाव वनपरिक्षेत्रांतर्गत गंधारी व जांभळी गावाजवळ कक्ष क्र.७४२ (PF) मध्ये तसेच मालकी शेत व पट्टा वाटप क्षेत्रामध्ये अवैध वृक्षतोड झाल्याचे माहे मे-२०२३ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे. सदर अवैध वृक्षतोडीत सरकारी क्षेत्रात तसेच वर्ग-१ वर्ग-२ पट्टा वाटप क्षेत्रात सागवान प्रजातीच्या एकुण ४७३ झाडांची विनापरवाना शेतकरी व लाकूडतोड कंत्राटदार यांनी अवैधरित्या वृक्षतोड केली असल्याचे निदर्शनास आले.

(२) हे खरे नाही,

प्राथमिक चौकशीत अवैध वृक्षतोड केल्याचे निदर्शनास आल्याने नियमानुसार वनगुन्ह्याची नोंद करुन आवश्यक कार्यवाही करण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.

(३) सदर अवैध वृक्षतोड प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन वनगुन्हा नोंद करुन, सागवान इमारती १०९ नग, जप्त करण्यात आले आहे. सदर जप्त मुद्दे माल वर्ग-१ (मालकी) क्षेत्रातील असल्यामुळे त्याबाबत वनगुन्हे नोंद करण्यात आले आहेत. तसेच वर्ग-२ (पट्टेवाटप क्षेत्र),संरक्षित वन कक्ष क्रमांक ७४२ व आबादी क्षेत्रामधील सागवान वृक्ष एकुण ३६४ नग अवैधरित्या वृक्षतोड प्रकरणात श्री. पुरुषोत्तम गोधन देशमुख व इतर-२ आरोपींविरुध्द वनगुन्हे नोंद करण्यात आले असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आले आहे.अवैध वृक्षतोडी प्रकरणी क्षेत्र सहायक, गोठणगांव व वनरक्षक, गोठणगांव बिट यांना जबाबदार धरुन उपवनसंरक्षक गोंदिया वन विभाग यांच्या दिनांक २७.०६.२०२३ च्या आदेशान्वये त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामुद्रिक संस्थांकडून पर्यावरण आणि मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत

**(३७) ६८१५० (२९-०८-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामुद्रिक सर्वेक्षण करणा-या संस्थांकडून जैवविविधतेची वस्तुस्थिती लपवण्याचा प्रयत्न होत आहे, अशा संस्थांच्या सर्वेक्षण अहवालामुळे पर्यावरण आणि मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृषी समितीने माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने अशा संस्थांच्या विरोधात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओशीनिओग्राफीच्या कार्यालयाबाहेर माहे जून, २०२३ मध्ये आदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१३-१०-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ ओशीनिओग्राफी ही संस्था Council of Scintific and Industrial Research, Ocean Developement केंद्र शासन यांच्या अखत्यारितील स्वयंशासित संस्था आहे. याप्रकरणी केंद्र शासनाकडून चौकशी अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी विकास विभागात रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मागण्यांबाबत**

**(३८) ६८५९६ (१०-१०-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी विकास विभागातील रोजंदारीवरील वर्ग ३ आणि वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी मंत्रालयाच्या दिशेने पायी मोर्चा काढला असल्याचे दिनांक १४ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१९-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २०.०६.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे शासकीय आश्रमशाळेतील / वसतीगृहातील मंजूर रिक्त पदे विभागाकडे बाह्यस्रोत यंत्रणा निश्चित होईपर्यंत पूर्वी कामे करीत असलेल्या रोजंदारी/तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांमधून भरण्याबाबत सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना कळविण्यात आले आहे त्यामूळे रोजंदारी कर्मचारी यांनी मोर्चा स्थगित केला आहे.

तद्नंतर आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २५.०७.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे शासकीय आश्रमशाळेतील / वसतीगृहातील रिक्त असलेल्या पदांवर यापूर्वी नियमितीकरणाचे आदेश झालेल्या मात्र अद्याप नियुक्ती आदेश न दिलेल्या कर्मचाऱ्यांची पदे वगळून उर्वरिक्त रिक्त पदांवर रोजंदारी/तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना घेण्यात यावे. सदर कर्मचाऱ्यांच्या सेवा घेतांना ज्यांच्या सेवा जास्त वर्ष झालेल्या आहेत, त्यांना प्राधान्य देण्यात यावे असे क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वणी, झरी व मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील मातोश्री योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या पाणंद रस्त्यांची मंजुर कामे प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ६८८४४ (२८-०८-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी, झरी व मारेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील मातोश्री पाणंद रस्ता योजनेंतर्गत सन २०२१-२२ या कालावधीत मंजुर कामे मागील दीड वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे मार्गी लावण्यासाठी शासनाने संबंधित विभागाला विशेष आदेश दिले आहेत तसेच पाणंद रस्ते व शेतकऱ्यांचे प्रश्न प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी विभागाकडून कार्यवाही करण्यासाठी काही कालबद्ध कार्यक्रम ठरवून दिला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार पाणंद रस्ता दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबांची करणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (११-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) वणी, झरी आणि मारेगाव या तालुक्यामध्ये एकुण ९३ कामांपैकी ५९ कामांना तांत्रिक मान्यतेसह ५६ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच, ७ कामे प्रगतीपथावर आहेत.

ज्या ठिकाणी तक्रारी आहेत त्या ठिकाणी तालुका स्तरीय समिती व जिल्हा स्तरीय समिती यांच्यामार्फत कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र कृषि विकास महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना वेतन आयोगाच्या फरकाच्या रक्कमेचा अध्यादेश काढण्याबाबत

**(४०) ६९१९४ (२८-०८-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषि विकास महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३० जून, २०२१ या कालावधीत वेतन आयोगाच्या फरकाच्या रक्कमेचा अध्यादेश काढण्याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्य शासनाच्या अखत्यारीतील सार्वजनिक उपक्रमांना ७ वा वेतन आयोग लागू करणे ही धोरणात्मक बाब असून त्याबाबतचे निकष राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ रोजी वित्त विभागाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळास ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी दिनांक १ जुलै, २०२१ पासून लागू करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत महामंडळ/ सार्वजनिक उपक्रम यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत ७ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा. मंत्रिमंडळ स्तरावर कोणताही निर्णय झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम ही कर्जामध्ये वळती होत असल्याबाबत**

**(४१) ६९२४६ (२८-०८-२०२३). श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना विविध योजनेद्वारे नुकसान भरपाईचा निधी अनेक बँका शेतकऱ्यांच्या कर्जखात्यामध्ये वळते करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यात मदत केल्यानंतर ती परस्पर कर्जामध्ये वळती करणाऱ्या संबंधीत बँकेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-१०-२०२३) :** (१) नाही. अशा स्वरूपाच्या कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात ग्रामीण भागात इंटरनेट अभावी शेतकऱ्यांना वेळेत पीक नोंदणी करता येत नसल्याबाबत**

**(४२) ६९६५५ (२८-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात भात उत्पादन वाढत असताना मात्र शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ मिळण्यास अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मागील दोन वर्षापासून महा ई-पीक पोर्टलवर भात पिकांची नोंद सक्तीची केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पीक नोंदीसाठी इंटरनेट सेवा मिळत नसल्याने वेळत पीक नोंदणी न झाल्यामुळे हमीभावापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अडचणी दूर करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

शासन निर्णय क्रमांक :-२०१८/प्र.क्र.९२/(भाग-१)/ज-१ अ, दिनांक ३० जुलै, २०२१ अन्वये आपल्या शेतातील पिकांची नोंद ई - पीक पाहणी मोबाईल ॲप द्वारे शेतकऱ्यांना ऑनलाइन पद्धतीने करण्यासाठी दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ पासून ई- पीक पहाणी नोंदविण्याची प्रक्रिया संपूर्ण राज्यामध्ये सुरु करण्यात आलेली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे इंटरनेट सुविधा फक्त नविन नाव नोंदणी (one time) करणे करिता आवश्यक आहे व ही प्रक्रिया केवळ एकदाच करावी लागते. मोबाईल ॲपद्वारे प्रत्यक्ष शेतामध्ये पिकांची नोंद करण्यासाठी इंटरनेटची आवश्यकता नाही. शेतामध्ये इंटरनेट नसतानाही (ऑफलाईन) ई-पीक पाहणी करता येते.

हमीभावापासून शेतकरी वंचित राहू नये याकरिता ई-पीक वा पाहणी मोबाईल ॲपमध्ये किमान आधारभूत योजनेअंतर्गत येणाऱ्या पिकांसाठी (ज्यामध्ये "धान/साळ/भात" या पीकाचाही समावेश आहे) "किमान आधारभूत किंमत योजने अंतर्गत विक्री साठी नोंदणी करावयाची आहे काय?" अशा प्रकारचा प्रश्न विचारून त्याला होय किंवा नाही असे

पर्यायांद्वारे विक्रीसाठी संमती देण्याबाबत सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात गायीच्या दुधाचा प्रती लिटर ४० रुपये दराचा हमीभाव कायदा करुन त्यामध्ये प्रत्येकी तीन वर्षांनी वाढ करण्याबाबत

**(४३) ६९७६८ (२४-०८-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गायीच्या दूधाला जो दर मिळतो तो समाधानकारक नाही म्हणून प्रती लिटर ४० रुपये दराचा हमीभाव कायदा करावा व त्यामध्ये प्रत्येकी तीन वर्षांनी वाढ करावी असे निवेदन पुणे विभागाच्या प्रादेशिक दुग्ध व्यवसाय अधिका-यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेमार्फत माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीकरीता मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील आंधळगाव येथे राष्ट्रीय महामार्गावर दूध उत्पादकांनी रास्ता रोको आंदोनल करून मागण्यांचे निवेदन नायब तहसिलदार यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीवर निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२३-१०-२०२३) :** (१) राज्यात गायीच्या दुधाचा प्रतिलिटर रु.४०/- कायदा करावा दराचा हमीभाव कायदा करून त्यामध्ये प्रत्येकी से निवेदन पुणे तीन वर्षांनी वाढ करण्याबाबतच्या विषयान्वये जांना स्वाभिमानी स्वाभिमानी शेतकरी संघटना सोलापूर यांचे वा त्यादरम्यान दिनांक २४.०५.२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यातील दूध दर प्रश्नाबाबत विविध दूध उत्पादक शेतकरी संघटना व पशूखाद्य कंपन्यांच्या प्रतिनिधीसोबत दिनांक २२.०६.२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत झालेल्या निर्णयानुसार खाजगी / सहकारी दूध संघांचा परिचालन खर्च तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च विचारात घेऊन शेतकऱ्यांच्या दुधाला रास्त भाव मिळावा यानुषंगाने दूध दर निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली.
सदर समितीने शिफारस केल्याप्रमाणे राज्यातील सहकारी व खाजगी दूध प्रकल्प यांच्यामार्फत खरेदी करण्यात येणाऱ्या ३.५ /८.५ या गुणप्रतिच्या गाय दूधाकरिता किमान रु.३४ प्रतिलिटर या दरास शासन निर्णय दि. १४.०७.२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली असून सदरचे दर विनाकपात दुध उत्पादक शेतकरी यांना अदा करणे अभिप्रेत राहिल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सहकारी साखर कारखान्यांच्या दर्शनी भागाच्या मूल्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(४४) ७०६७६ (११-०९-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासन निर्णय आदेशान्वये क्र.ससका/२०२०/प्र.क्र.८५/३-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग हा शासन निर्णय अधिनियम, १९६० चे कलम ७९ अ सहकारी साखर कारखान्यांसाठी झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन आदेशाद्वारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९ अ चा चुकीचा वापर करुन तत्कालीन शासनाने राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांना सभासदांच्या दर्शनी भागाची किंमत रु.१०,०००/- वरुन रु.१५,०००/- करण्याबाबत दिनांक १८ मे, २०२१ रोजी आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील आदेशाचा गैरफायदा घेवून राज्यातील बहुतांश सहकारी साखर कारखाने शेतकरी सभासदांकडून सक्तीने वाढीव रक्कम वसूल करित असल्यामुळे सभासदांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे कलम ७९ अ अधिकारांचा वापर करुन सहकारी साखर कारखान्यांच्या दर्शनी भागाच्या मूल्यामध्ये रु.१०,०००/- वरुन रु.१५,०००/- वाढ करण्याचा निर्णय रद्द करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-१०-२०२३) : (**१) होय
(२) सभासदांच्या भागाची किंमत रु.१०,०००/- वरुन रु.१५,०००/- करण्यांत आली आहे. तथापि, कलम ७९-अ चा वापर चुकीचा झालेला नाही.
(३) नाही. सहकारी साखर कारखान्यांना प्रकल्प उभारणीसाठी वित्तीय संस्थांकडून कर्ज घेताना, कर्ज उभारण्याची क्षीण झालेली क्षमता, उणे नक्तमूल्य या समस्या कर्ज उभारणी करतांना येत आहेत. कारखाना आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी स्वनिधीत वाढ होणे आवश्यक असल्याने शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अ नुसार निर्देश दिलेले आहेत. वाढीव भागानुसार सभासदांनी रक्कम जमा करणे आवश्यक आहे. त्यासाठी अन्याय होतो हे म्हणणे योग्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) लागू नाही.

---

## नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यातील रस्ते कामांमध्ये अपहार झाल्याबाबत

**(४५) ७०७४३ (०३-०९-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यातील लेखाशिर्ष ३०५४ योजनेंतर्गत सुमारे ३५ कोटींच्या विकास कामांच्या निधीपैकी काही रस्त्यांची कामे न करता परस्पर बिले काढून अपहार केल्याने याची चौकशी करणेबाबत शासनाकडे निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवापूर तालुक्यातील लेखाशिर्ष ३०५४ योजनेंतर्गत २४४ रस्त्यांची कामे आर्थिक वर्ष सन २०२२-२३ मध्ये मंजूर झाली होती, या कामांसाठी शासनाने सुमारे ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी व त्यांचे संबंधित ठेकेदार यांनी कामे न करता परस्पर बिले काढून रकमेचा अपहार केल्याचे निवेदन जिल्हाधिकारी, नंदुरबार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसिलदार, नवापूर, गटविकास अधिकारी, नवापूर यांचेकडे पाठवून संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणेबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१९-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०२२-२३ मध्ये लेखाशिर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत नवापूर तालुक्यातील २५१ रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता रु.३७.८४ कोटी मंजूर करण्यात आले आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) जनहित याचिका क्र.३६/२०२३ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक १५/०६/२०२३ च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, नंदूरबार यांना संबंधित कामांचे व्हिडिओ चित्रीकरण करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत आदेशित केले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी कामांच्या चौकशी/तपासणीसाठी जिल्हास्तरीय तपासणी समिती व तालुकास्तरीय पथक/समिती गठित केली आहे. सद्यस्थितीत चौकशी चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदूरबार जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामांसाठी मंजूर झालेल्या कोटी रुपयांच्या घोटाळ्याची चौकशी करण्याबाबत

**(४६) ७०७६० (०४-०९-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार जिल्हयातील ११०४ रस्त्यांच्या कामांबाबत मा. उच्च न्यायालयाने संबंधित कामांचे व्हिडिओ चित्रीकरण करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानूसार आदिवासी विकास विभागाअंतर्गत नंदूरबार जिल्हयासाठी रुपये ३२६ कोटी रुपयांचे अनुदान रस्त्यांच्या कामांसाठी मंजूर केले त्यातील ७५ कोटी २५ लाख रुपये जिल्हा परिषदेकडे वितरीत करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कामे न करता बिले काढून घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त गैरव्यवहार प्रकरणी संबंधीत दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१३-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १६/०२/२०२३ अन्वये लेखाशिर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत राज्यातील १९ जिल्ह्यांमधील ५५१२ कामांकरिता रु.३२६.७७ कोटी वितरीत करण्यात आले आहेत. त्यापैकी नंदुरबार जिल्ह्यातील १५४८ कामांकरिता रु.७३.२५ कोटी वितरीत करण्यात आले आहेत.

(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३/०६/२०२३ च्या आदेशान्वये सदर कामांची चौकशी/तपासणीसाठी जिल्हास्तरीय तपासणी समिती व तालुकास्तरीय पथक/समिती गठित केलेली आहे. सद्य:स्थितीत चौकशी चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील भूजल आणि सागरी मच्छीमार मासेमारी साधनांच्या अर्थसहाय्य योजनेतील लाभधारकांसाठी उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत

**(४७) ७०७८१ (२४-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूजल आणि सागरी मच्छीमारांसाठी मासेमारी साधनांच्या अर्थसहाय्य योजनेतील लाभधारकांसाठी आर्थिक दुर्बल घटकाची अट शिथील करुन लाभधारकांची उत्पन्न मर्यादा वाढविण्यात यावी, अशी मागणी विविध मच्छिमार संघटनांनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासेमारी साधनांवर अर्थसहाय्य योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थी आणि सर्वसामान्य मच्छीमारांना होण्यासाठी शासनाने उक्त मागणीच्या अनुषंगाने निर्णय घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

भूजल व सागरी क्षेत्रातील जास्तीत जास्त मच्छीमारांना लाभ देण्याच्या अनुषंगाने मासेमारी साधनावर अर्थसहाय्य देण्याबाबतचा दिनांक २८/०९/२०१० व १८/११/२०१० रोजीचे शासन निर्णय अधिक्रमित करून, दिनांक ९/०२/२०२३ रोजी नवीन शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामध्ये आर्थिक दुर्बल घटकाची अट नमूद नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात तुकडेबंदी व महारेराच्या नियमांचे उल्लंघन करून केलेल्या दस्त नोंदणीबाबत

**(४८) ७०८६७ (२५-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२० ते २०२२ या कालावधीत तुकडेबंदी व महारेराच्या नियमांचे उल्लंघन करून दस्त नोंदणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दस्तांची फेर तपासणी करण्यासाठी स्वतंत्र पथक स्थापन केले असून पथकांनी आत्तापर्यंत नियम डावलून किती दस्तांची फेरतपासणी व दस्त नोंदणी केल्याबाबत पाठपुरावा केला आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर प्रकरणी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (११-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

शासन निर्देशाच्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी "दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांच्या अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक कार्यालयात सन २०२० ते २०२२ या तीन वर्षाच्या कालावधीतील नोंदणी झालेल्या सर्व दस्तांची तपासणी नोंदणी नियम १९६१ च्या नियम ४४ (आय) मधील तरतुदींच्या अनुपालनाच्या अनुषंगानेच न-करता सर्वकष तपासणी (मुल्यांकनासहीत) सह जिल्हा निबंधक कार्यालय यांचे स्तरावर करणेबाबत कालबध्द कार्यक्रम आखून उक्त तपासणी एक वर्षाच्या आत पुर्ण करुन अहवाल त्यांना सादर करण्याचे कळविले आहे.

(३) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कळविल्यानुसार उक्त तपासणी पथकाकडून तपासणी करण्यात येत असून यामध्ये एकूण ६२००९२ दस्तांची तपासणी करण्यात आली आहे. उर्वरित दस्तांची तपासणी कालबध्द पध्दतीने करण्यात येत असून तपासणी करण्यात आलेले आक्षेप अंतिम करण्याची कार्यवाही सबंधित सह जिल्हा निबंधक आणि नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, यांचे स्तरावर सुरु आहे. त्याअनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयाकडून उक्त तपासणीबाबतचा अंतिम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर उक्त अहवालामध्ये नमूद बाबींच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार प्रकरणपरत्वे संबंधितांवर नोंदणी अधिनियमाच्या तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमाच्या तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) येथील मिळकतीमध्ये झालेल्या अनधिकृत उत्खननाबाबत

**(४९) ७०८६८ (११-०९-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) मौजे वाघोली (ता.हवेली, जि.पुणे) गट नंबर १३४४/३ व गट नंबर १३४४/४ या मिळकतीमध्ये ए.आय.जी.पी. डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांच्याकडून उत्खनन करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गट नंबरवर तलाठी यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी २ वाजता जाऊन पाहणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ए.आय.जी.पी. डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे यांनी उत्खननाच्या परवानगी पेक्षा जास्तीचे उत्खनन केले आहे असे तलाठी यांच्या पंचनाम्यावरुन निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गट नंबर १३४४/३ व गट नंबर १३४४/४ मध्ये झालेल्या उत्खननामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने संबंधित तहसीलदार अधिकारी यांना तत्काळ निलंबित करुन उक्त डेव्हलपर्सवर गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) मौजे वाघोली (ता. हवेली, जि.पुणे) येथील ग.नं.१३४४/३ व गट नं.१३४४/४ मिळकतीमध्ये ४०,००० ब्रास गौण खनिज उत्खनन व वाहतूकीसाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक ०६.१०.२०२२ च्या आदेशान्वये संबंधित विकासक यांना परवानगी देण्यात आली. सदर क्षेत्रातून झालेल्या उत्खनन बाबत केलेल्या चौकशी मध्ये विकासक यांनी परवान्यापेक्षा अधिकचे ४०८५८ ब्रास उत्खनन व वाहतूक केल्याचे आढळून आल्याने तहसिलदार, हवेली यांनी दिनांक २९.०६.२०२३ अन्वये रू.१३,४५,८६,२५२/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश पारित केले आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कृषी विभागात कृषी सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५०) ७१४३० (२९-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या कृषी विभागात कृषी सहाय्यकांची २११५ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कृषी सहाय्यकांची पदे भरण्यासाठी दिलेली जाहिरात १५ दिवसांत काढणार असल्याचे मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सन २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषदेच्या पटलावर जाहीर केलेले असूनही अद्यापही भरती प्रक्रिया राबविण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२३ वा मध्ये त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत उक्त पदांसाठी पद भरतीची प्रक्रिया राबविण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय तसेच यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०५-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

कृषि विभागात कृषि सहाय्यकांची सरळसेवेच्या कोटयातील १०४३९ पदे मंजूर असून यापैकी माहे ऑगस्ट, २०२३ अखेर ८२५८ पदे भरलेली व २१८१ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) कृषि सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात लवकरात लवकर काढण्यात येईल असे मा.मंत्री (कृषि), महाराष्ट्र राज्य यांनी सन २०२३ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात विधानपरिषदेच्या पटलावर जाहिर केले.

वित्त विभागाच्या दिनांक ३१.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही अशा विभागांना (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. त्यानुसार विभागीय कृषि सहसंचालक, पुणे, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, लातूर, आणि कोल्हापूर या कार्यालयांच्या स्तरावरुन दिनांक ११.०८.२०२३ व दिनांक १२.०८.२०२३ रोजी विभागनिहाय एकूण २१०९ पदांकरीता जाहिराती प्रसिध्द करण्यात आल्या असून पदभरतीची पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.